नि.फौ.ख.क्र.१०३/२०१८.
सरकार वि. भोजराज व इतर
निशाणी क्र.१३०.

## <u>आरोप निश्चीत करण्यापूर्वीचा पुरावा</u>

**सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०३ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** – बंडू माणिक कुंभरे

**वय** – ५० वर्षे **व्यवसाय** – शेती,

**राहणार** – सिल्लारी, नागपूर , जिल्हा नागपूर.

**<u>सरतपास सरकार तर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री जी. आर. गजभिये यांच्या तर्फे</u>**

**०१.** घटना साधारण २०१८ साली घडली होती. त्यावेळी मी सलामा गेट येथे वनमंजूर म्हणून कार्यरत होतो. वायरलेश मासेज आला की, तेथे आरोपी आहेत. त्यामुळे क्षेत्रसहाय्यक यांनी तेथे जाण्यास सांगितले. त्यानंतर मी, सोबत दोन वनरक्षक व क्षेत्रसहाय्यक व ५–७ मजूर आम्ही निघालो. त्यानंतर मॅगझींन नाला क्र.२ तेथे आम्हाला लोक आढळले. ते लोक तेथे बसलेले होते. तेथे एस.टी.पी.एस. यांचे जवळ गस्ती करत आले. त्यानंतर त्या लोकांना घेरावा घातला व त्यांना पकडून पिंपरिया कार्यालय येथे आणले. त्यानंतर त्यांचे बयान वैगेरे घेतले. त्यानंतर त्यांना अटक केली. असे अंदाजे तेथे २०–२५ लोक होते. माझे बयान देखील घेतले होते. जे लोकांना माझ्या समोर पकडले होते त्यांना मी ओळखतो. सर्व आज रोजी न्यायालयात हजर आहेत. आता मला दाखविण्यात आलेले बयान नि.१०८ तेच आहे. त्यावर माझी, वनरक्षक खोरघडे व क्षेत्रसहाय्यक देवकर यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

**<u>उलट तपासणी आरोपीचे वकिल श्री ए.व्ही. गजभिये व श्री ए.जी. कारेमोरेयांनी सांगितल्यावरुन साक्षीदाराचा उलट तपास राखून ठेवला.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–

रामटेक

**(श्रीमती. डी. एस.सैंदाणे )**

दिनांक – २२/०२/२०२३

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
रामटेक